आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५ )

शुक्रवार  दिनांक १ मे  २०२६

ठळक बातम्या..

- महाराष्ट्र दिनाच्या मुख्य सोहळ्यात मुंबईत राज्यपालांच्या हस्ते ध्वजारोहण, महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, अशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका

- विदर्भात महाराष्ट्र दिनाचा उत्साह, नागपूरला एक शक्तिशाली 'ग्रोथ हब' म्हणून विकसित करणार  - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्धार

- राज्यात आजपासून जनगणनेच्या प्रक्रियेला सुरुवात, नागपुरात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी अन् महापौर निता ठाकरे यांनी 'स्व गणना' करीत नोंदविला जनगणनेत सहभाग

- नागपुरातील संविधान चौक आणि विधान भवन परिसरात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी आंदोलन

स्थापना दिन

महाराष्ट्र  राज्याचा ६७ वा स्थापना दिन आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची पवित्र भूमी देशभक्ती, साहस आणि आत्मसन्मानाची प्रेरणा देते असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर महाराष्ट्र हे उच्च सांस्कृतिक परंपरा, सामाजिक सुधारणा, आणि सर्वांगीण प्रगतीचं प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. महाराष्ट्रानं साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट, याप्रमाणेच उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि समाजसेवेत प्रगतीचे नवे मानदंड प्रस्थापित केले असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं  आहे.

## महाराष्ट्र दिन

महाराष्ट्रात आज राज्य स्थापना दिनानिमित्त ध्वजवंदन, संचलन आणि इतर कार्यक्रम होत आहेत. मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर झालेल्या मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर राज्य पोलीस तसंच इतर पथकांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली. भाषणाची सुरुवात मराठीत करताना ते म्हणाले.

## महाराष्ट्र दिन

स्वभाषेचा अभिमान असलाच पाहिजे, महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, मात्र मराठी न येण्यावरू न हिंसा कधीही खपवून घेतली जाणार नाही, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त मुंबईत संयुक्त महाराष्ट्र लढ्यात बलिदान देणाऱ्यांच्या हुतात्मा स्मारकावर आदरांजली वाहिल्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

महाराष्ट्र संकुचित वृत्तीचा कधीच नव्हता, महाराष्ट्राच्या भक्ती संप्रदायानं, आणि सुधारणावादानं देशाला दिशा दिली असून राज्याची अर्थव्यवस्था जगात तिसाव्या क्रमांकावर असल्याचं ते म्हणाले.राज्यातल्या जनतेला त्यांनी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या तसंच जागतिक कामगार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## विदर्भ राऊंड अप

विदर्भातील सर्व जिल्ह्यांत आज महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. नागपुरात मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा महसूलमंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी बोलताना त्यांनी राज्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय आधारित प्रकल्पांमुळे मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसंच नागपुरातील विविध विकास प्रकल्पांचा आढावा घेत क्रीडा, ऊर्जा आणि उद्योजकता क्षेत्रातील व्यक्तींचा गौरवपूर्ण उल्लेख केला. यावेळी त्यांनी नागपुरला ग्रोथ हब म्हणून विकसित करत असून आगामी  होऊ घातलेल्या चित्रनगरीबद्दल माहिती दिली.

नागपूर महानगरपालिका मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात महापौर निता ठाकरे यांनी स्वच्छ, सुंदर आणि हरित नागपूरच्या शाश्वत विकासासाठी सर्वांनी कटिबद्ध राहण्याचं आवाहन केलं भंडारा इथं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, तर बुलढाण्यात पालकमंत्री मकरंद पाटील यांनी जिल्ह्यातील ८६८ कोटी रुपयांच्या निर्यातीमुळे स्थानिक उद्योगांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध झाल्याचं सांगितलं.वर्ध्यात खनिकर्म राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले अमरावती इथं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढविणं आणि उद्योगविकास हे शासनाचं प्रमुख उद्दिष्ट असल्याचं सांगितलं.चंद्रपूर महानगरपालिकेत महापौर संगीता खांडेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडलं, तर गोंदिया इथं वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ झाला.गडचिरोली इथं पोलिस मुख्यालयाच्या पटांगणावर गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यातआले.यावेळी ॲड.जयस्वाल यांनी "समृद्ध गडचिरोली" घडवण्याचा संकल्प व्यक्त करत विकास, शांतता आणि पर्यावरण संवर्धन या त्रिसूत्रीवर आधारित सर्वांगीण प्रगतीचा निर्धार व्यक्त केला.विकसित भारताच्या उभारणीत महाराष्ट्राचे योगदान महत्त्वपूर्ण ठरेल, असं प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केलं .यवतमाळ जिल्ह्यात महाराष्ट्र दिनाचा उत्साह बघायला मिळालं.

<u>शांतीवन</u>

नागपूरच्या काटोल रोडवरील फेटरी जवळ असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तुसंग्रहालय शांतीवन चिचोली इथं आज बुद्ध पौर्णिमेनिमित्त सायंकाळी 5 फूट उंच बुद्ध मूर्तीचं अनावरण थायलंड इथून आलेल्या भिक्खू संघाच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती शांतीवनचे व्यवस्थापक संजय पाटील यांनी दिली आहे.

<u>'संघ गंगा के तीन भगीरथ'</u>

नागपुरात सादर करण्यात आलेल्या 'संघ गंगा के तीन भगीरथ' या नाटकानं १०० प्रयोगांचा टप्पा पूर्ण केला आहे. गेल्या वर्षी वनामती इथं सुरू झालेल्या या नाटकाचा १००वा प्रयोग नुकताच दिल्लीतील केशव कुंज इथं सादर करण्यात आला. संघाच्या तीन दिग्गज व्यक्तींच्या जीवनावर आधारित या नाटकाच्या यशानिमित्त नागपुरात बाईक रॅलीचं आयोजनही करण्यात आलं.

'स्व-गणना'

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलेल्या स्व-गणनेनं राज्यातल्या यंदाच्या जनगणनेच्या प्रक्रियेचा आज औपचारिक प्रारंभ झाला. राज्याच्या स्थापनादिनी जनगणना सुरू होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी राज्यातल्या जनतेला जनगणनेच्या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन केलं.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि नागपूरच्या महापौर नीता ठाकरे यांनी डिजिटल पद्धतीनं 'स्व-गणना' करून १६ व्या राष्ट्रीय जनगणनेत सहभाग नोंदवला. नागपूर शहरात आजपासून जनगणना प्रक्रियेला सुरुवात झाली असून, १ ते १५ मे दरम्यान नागरिकांना ऑनलाइन स्व-गणना करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी se.census.gov.in या पोर्टलवर माहिती भरून राष्ट्रीय कार्यात सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आलं आहे.यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणक घरभेटी देऊन 'HLO App'च्या माध्यमातून माहिती संकलित करणार आहेत. नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी ४५०० प्रगणक आणि ७०० पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्वतंत्र विदर्भ

महाराष्ट्र स्थापना दिनाच्या पार्श्वभूमीवर नागपुरातील संविधान चौक आणि विधान भवन परिसरात स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. मुकेश मासूरकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलकांनी काळे कपडे परिधान करून काळे फुगे सोडत निषेध व्यक्त केला.आंदोलनामुळे परिसरात काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झाले असून वाहतुकीवरही परिणाम झाला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतलं.

राज्यस्तरीय कबड्डी

नागपूरच्या कोराडी इथं आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी महाराष्ट्राला 'स्पोर्ट्स पॉवरहाऊस' बनविण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचं सांगितलं. तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर कोट्यवधी रुपयांची क्रीडा संकुलं उभारली जात असून मानकापूर इथं ७४६ कोटी रुपयांत आंतरराष्ट्रीय दर्जाचं 'नागपूर स्पोर्ट्स हब' साकारले जात असल्याची माहिती त्यांनी दिली.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ग्रामीण

भागातील खेळाडूंना व्यासपीठ देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या असल्याचं सांगितलं. १९ वर्षांनंतर नागपूर जिल्ह्यात होत असलेल्या या स्पर्धेत राज्यभरातील ३२ संघ सहभागी झाले आहेत. आज स्पर्धेचा दुसरा दिवस आहे.

<u>एलपीजी</u>

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आजपासून तब्बल ९९३ रुपयांनी वाढवली आहे. त्यामुळे मुंबईत १९ किलो वजनाचं व्यावसायिक वापराचं सिलिंडर ३ हजार २४ रुपयांना मिळेल. एप्रिल महिन्यात या सिलिंडरची किंमत १९५ रुपये ५० पैशांनी, आणि मार्चमध्ये ११४ रुपये ५० पैशांनी वाढवली होती. घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरची किंमत ९१२ रुपये ५० पैशांवर कायम राहणार आहे. विमान इंधनाच्या किंमती पेट्रोलियम कंपन्यांनी ५ टक्क्यानं वाढवल्या आहेत. केंद्र सरकारनं डिझेलच्या निर्यातीवरचा कर लिटरमागं २३ रुपयांनी घटवला आहे. तर विमान इंधनावरचा कर ३३ रुपयांनी कमी केला आहे. देशांतर्गत वापराच्या डिझेलवरच्या करांमध्ये मात्र कुठलाही बदल झालेला नाही. सर्वसामान्य जनतेसाठी पेट्रोल, डिझेल आणि रॉकेलच्या किरकोळ दरात कोणताही बदल झाला नसल्याचं इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<u>हवामान</u>

आगामी काही तासात नागपूर, भंडारा, गोंदिया जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागानं वर्तवली आहे. याशिवाय यवतमाळ जिल्ह्यात देखील काही ठिकाणी वादळी पर्जन्यमान राहू शकतं, असा इशारा हवामान केंद्रानं दिला आहे. मागील 24 तासात विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं 44 अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं, तर नागपुरात आज 43 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.

<u>ऑनलाइन गेमिंग</u>

'ऑनलाइन गेमिंग प्रोत्साहन आणि नियमन नियम', आजपासून लागू झालं. भारताच्या वेगानं विस्तारणाऱ्या ऑनलाइन गेमिंग क्षेत्राचं नियमन करण्याच्या दिशेनं उचललेलं हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नशीब किंवा कौशल्य यांच्या आधारे पैशांनी खेळल्या जाणाऱ्या ऑनलाइन खेळांवर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे.

*****